**प्रारुप**

**प्रकल्प प्रवर्तक बृहन मुंबई महानगरपालिका यांच्या अस्तित्वात असलेल्या देवनार डंपिंग ग्राऊंड, मुंबई येथील प्रस्तावित ४.० मेगावॅट वीजनिर्मिती ही ६००.० टीपीडी कच-यापासून वेस्ट टू एनर्जी करणा-या प्रकल्पाची ऑनलाईन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीबाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक बृहन मुंबई महानगरपालिका यांच्या अस्तित्वात असलेल्या देवनार डंपिंग ग्राऊंड, मुंबई येथील प्रस्तावित ४.० मेगावॅट वीजनिर्मिती ही ६००.० टीपीडी कच-यापासून वेस्ट टू एनर्जी करणा-या प्रकल्पाची ऑनलाईन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक २७.०४.२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

बैठकीच्या सुरवातीस डॉ. विकास नाईक, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगरे, मुंबई तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीची सुरवात करताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. बृहन मुंबई महानगरपालिका यांच्या अस्तित्वात असलेल्या देवनार डंपिंग ग्राऊड, मुंबई येथील प्रस्तावित् ४ मेगावॅट वीजनिर्मिती ही ६००.० टीपीडी कच-यापासून करण्यात येणार असल्याने कचरा ते उर्जा अशा या प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी ही कोविडच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन आयोजित करण्यात आलेली असून ऑनलाईन उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले. त्यांनी जनसुनावणीची संपूर्ण प्रक्रियेची माहिती देताना सांगितले की प्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती हे जनसुनावणी व प्रकल्पाविषयी माहिती देतील. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण व तांत्रिक सल्लागार हे प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरणाव्दारे माहिती देतील. त्यानंतर उपस्थितांना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय शंका, सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याची संधि देण्यात येईल. त्यास प्रकल्प प्रवर्तक किंवा प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार हे उत्तरे देतील. बैठकीच्या शेवटी आपणास ईमेलही उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यावर आपण आपले काही आक्षेप असल्यास ते आजच जनसुनावणी दरम्यान नोंदवायचे आहेत. त्यांनी श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी – मुंबई-3, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढील कार्यवाही सुरु करण्याची सूचना केली.

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी – मुंबई-3, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. विकास नाईक, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगरे तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. अनंत हर्षवर्धन, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, ऑनलाईन उपस्थित असलेले प्रकल्प

प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण प्रेमी, स्वयंसेवी संघटना व स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

त्यांनी सांगितले प्रकल्प प्रवर्तक बृहन मुंबई महानगर पालिका यांचा अस्तित्वात असलेल्या देवनार डम्पिंग ग्राऊंड, मुंबई येथे ६०० टीपीडी कच-यापासून ४ मेगावॅट वीज निर्मिती म्हणजे वेस्ट टू एनर्जी निर्माण करणा-या प्रकल्पाच्या जनसुनावणीसाठी आपण सर्वजण ऑनलाईन उपस्थित आहोत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जनसुनावणी ही भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१.१२.२००९ अनुसार व सागरी तटीय विनियमन क्षेत्र अधिनियम ६ जानेवारी, २०११ मध्ये मुद्दा क्रं. ८ व्ही (डी) (सी) ४ नुसार आयोजित करण्यात आलेली असून त्याअनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई ३४ ऑफ २०२१ , व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २१०४०९-एफटीएस ०००९ दिनांक ०९/०४/२०२१, अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगरे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | **-अध्यक्ष** |
| २) | प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) | **-सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-3<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>मुंबई | **-आयोजक** |

श्री. प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-३, म.प्र.नि. मंडळ, मुंबई तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या-१९ साथरोगच्या पार्श्वभूमीबाबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या कार्यालयीन निर्देश (Office Memorandum) दिनांक १४.०९.२०२० व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे क्रं.बी-२००९१७ - एफटीएस-००८२, दिनांक १७.०९.२०२० चे निर्देश आणि पर्य़ावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ह्यांचे दिनांक ०३.१२.२०१९ चे निर्देशांनुसार आयोजित करण्यात आलेली आहे. मात्र महाराष्ट्र शासनाव्दारे आपत्कालीन व्यवस्थापन कायदा अंतर्गत "ब्रेक द चेन" मध्ये जमावबंदीस/सार्वजनिक बैठकीस प्रतिबंद केलेला आहे. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष, जनसुनावणी समिती यांनी सदरील जनसुनावणी

ही संपूर्ण ऑनलाईन पध्दतीने पूर्वनियोजित दिनांक व निश्चित वेळेस आयोजित करण्याचे आदेश दिलेले असल्याने उपस्थितांना संकेत स्थळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २६.०६.२०२० रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती – Terms of Reference) देण्यात आली .त्यात पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी त्याअगोदर जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

श्री. माने यांनी असे सांगितले की. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक बृहन मुंबई महानगरपालिका यांच्या अस्तित्वात असलेल्या देवनार डंपिंग ग्राऊंड, मुंबई येथील प्रस्तावित ४.० मेगावॅट वीजनिर्मिती ही ६००.० टीपीडी कच-यापासून वेस्ट टू एनर्जी करणा-या प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. राज्य पर्यावरण मूल्यांकन समिती पर्यावरण विभाग आणि वातावरणीय बदल यानी दिनक २६/०६/२०२१ रोजी TOR ला संमती दिली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक २७.०४.२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक नवशक्ती, मुंबई यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दी फ्री प्रेस जर्नल, मुंबई या वृत्तपत्रात इंग्रजीत दिनांक २४.०३.२०२१ रोजी पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते .कोविडच्या पार्श्भूमीवर सदरहू जनसुनावणी ही ऑनलाईन पध्दतीनेच घेण्याची सूचना माननीय जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी केल्यानंतर त्याबाबत शुध्दीपत्रक दैनिक नवशक्ती, मुंबई यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दी फ्री प्रेस जर्नल, मुंबई यात इंग्रजीत दिनांक २०.०४.२०२१ आणि दिनांक २१.०४.२०२१ दैनिक नवशक्ती, मुंबई रोजी संपुर्ण लिंकची माहिती प्रकाशित करण्यात आलेली होती.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू. सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४०००१, मा. जिल्हाधीकारी कार्यालय, मुंबई उपनगरे, मा. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई

उपनगरे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, मुंबई उपनगरे, सहायक आयुक्त, एम/पूर्व वॉर्ड, मुंबई महानगर पालिका, ऑफिस बिल्डिंग, स्वर्गीय मधुकर तुकाराम कदम मार्ग पेरीफेरी रोड जंक्शन, देवनार म्युनिसिपल कॉलनी, गोवंडी(पूर्व), मुंबई – ४०००४३, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, सहसंचालक (जल प्रदूषण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप प्रादेशिक अधिकारी-मुंबई-३, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, आणि मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते .आयोजक यांनी असे सांगितले की स्थानिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ यांना ज्या लेखी सूचना व ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या आहेत, त्यांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीत त्या उपस्थित करण्यात येतील. आयोजक यांनी ऑनलाईन उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात व बैठकीनंतर उपलब्ध केलेल्या ईमेलवर पाठवू शकता. श्री माने यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रकल्पाबाबत सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी ऑनलाईन सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की १९२७ सालापासून, देवनार क्षेपणभूमी ही शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एक प्रमुख जागा म्हणून वापरली जात आहे. प्रस्तावित जागा ही बृहन मुंबई महानगरपालिकाच्या मालकीची आणि संचालित आहे. सध्या शहरातील ६१००ते ६३०० टीपीडी कचऱ्यापैकी देवनार डम्पिंग ग्राऊंडवर ६००-८०० टीपीडी कचरा टाकला जात आहे

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बृहन मुंबई महानगरपालिकाने मुंबईत **कचरा - ते - उर्जा (डब्ल्यूटीई)** प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या प्रकल्पाची प्रतिदिन क्षमता ६०० टन इतकी असेल. तसेच, हा प्रकल्प एसडब्ल्यूएम नियम २०१६ आणि इतर सर्व लागू नियमांचे पालन करेल.

**त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाची उद्दीष्टे सांगितली की** एसडब्ल्यूएम नियम २०१६ च्या अनुषंगाने जमीन संवर्धन आणि पर्यावरणीय अनुपालन यावर मुख्य जोर देऊन शाश्वत, पर्यावरणदृष्ट्या अनुकूल अशा प्रस्तावाचा विकास करणे, डंप साइटवरील ओझे कमी करणे, घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्यासाठी खुल्या डम्पिंगपासून वैज्ञानिक आणि सिद्ध प्रकारांकडे जोर देणे, देवनार डम्पिंग ग्राउंडच्या परिसरात पर्यावरणाला दिलासा देणे.

सदरहू प्रकल्पाचे विविध सामाजिक लाभ होणार आहेत. या प्रकल्पामुळे हवेची गुणवत्ता चांगली राहील्यामुळे जवळपासच्या भागातील आणि संपूर्ण शहराच्या लोकांना अनेक आरोग्य लाभ मिळतील, प्रकल्पामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल, प्रस्तावित प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे घातक पुनर्वापर करण्याच्या

क्रिया रोखल्या जातील, हरित पट्टा म्हणून प्रकल्प क्षेत्राच्या ३३% क्षेत्राची निर्मिती केली जाईल जेणेकरून देवनार डम्पिंग ग्राऊंडच्या परिसरातील पर्यावरणात सुधारणा होईल.

सादरीकरणानंतर डॉ. अनंत हर्षवर्धन, सद्स्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्वतःचा परिचय केल्यानंतर ऑनलाईन उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविण्याअगोदर आपले पूर्ण नांव व राहण्याचे ठिकाण सांगण्याचे आवाहन केले, जेणेकरुन त्याची नोंद इतिवृत्तात घेता येईल. त्याचप्रमाणे प्रश्न हे मुद्देसुत मांडून तेचतेच प्रश्न न विचारण्याच्या सूचना केल्या.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री मिराज अन्सारी, राहणार- रोड नं.8, बैगनवाडी, शिवाजीनगर, गोवंडी, डंपिंग ग्राऊंड शेजारी, मुंबईः-**

**प्रश्नः-** आपण ह्या करोना काळात जनसुनावणी आयोजित केलेली आहे. येथील लोक हे जास्त शिकलेले नाहीत. त्यामुळे बरेच लोक ऑनलाईन जनसुनावणीस हजर होऊ शकले नाही. त्याचप्रमाणे या भागात एसएमएस कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील लोकांना त्रास सहन करावा लागतो. प्रस्तावित प्रकल्पात किती सुरक्षितता (Safety) व सुरक्षा (Security) पाळण्यात येणार आहे याबाबत काहीही माहिती नाही. तरी माझी विनंती आहे की ही जनसुनावणी कोविड-१९ साथीचा रोग नाहिसा झाल्यानंतर परत बोलविण्यात यावी व याबाबत गंभीरतेने चर्चा होणे गरजेचे आहे.

**उत्तर :-** सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी कोविड-१९ साथीच्या काळात जारी केलेल्या मार्गदर्शक निर्देशांनुसारच सदरहू बैठक ही आयोजित करण्यात आलेली आहे असे सांगितले.

२) **श्री एद्दुल हबिब, राहणार - मालाड, मुंबईः-**

**प्रश्नः-** या प्रकल्पात वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात कच-यावर प्रक्रिया केल्यानंतर जी राख निर्माण होईल, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? त्याचा पुनर्वापर करता येईल काय? त्याचप्रमाणे असेही वाचण्यात आलेले आहे की उत्पन्न् होणारी राख ही वीटांसाठी वापरण्यात येते. आणि या राखेचा काही दुस-या प्रकारे उपयोग (Alternate Use) होऊ शकतो का?

**उत्तर :-** प्रकल्प अधिकारी श्री. पिंपळे यांनी सांगितले की नविन तंत्रज्ञानामुळे राखेची शास्त्रीय तपासणी करण्यात येऊन नंतरच त्याच्या वीटा तयार करण्यात येतात. पर्यावरण कायद्यांनुसार येथे उत्पन्न होणार राख ही मुख्य सेंट्रल लँड फीलमध्ये पुरण्यात येईल. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे जो आराखडा तयार करण्यात आला, त्याप्रमाणे मुख्य सेंट्रल लँड फीलमध्ये राख पुरल्यानंतर जी राख राहिल, ती वीटा बनविण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल. सुमारे ते प्रमाण ८% म्हणजे ६० टन असेल. वीटा तयार

करण्यासाठी राखेचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात येईल. कमीतकमी लँण्ड फीलमध्ये त्याचा वापर करण्यात येईल.

३) **एडव्होकेट नीशा बाफना, राहणार - कांदिवली, मुंबईः-**

**प्रश्नः-** वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात जो कच्चा माल/फीड असेल, ते काय असेल? त्याचप्रमाणे जे वेस्ट असेल ते फक्त fresh वेस्ट असेल की डंपिंग साईटवर अनेक वर्षे पुरलेले वेस्ट असेल?

**उत्तर :-** प्रकल्प अधिकारी श्री पिंपळे यांनी उत्तर दिले की प्रकल्पात जे फीड देण्यात येईल, ते मुंबईतील व मुख्यतः डपिंग ग्राऊंडच्या आजूबाजूच्या मुख्यतः एम, एस वार्डातील असेल व ते मिक्स वेस्ट असेल. प्रकल्पात आणल्यावर ते प्रथम वर्गीकरण क्षेत्रात (Segregation Zone) जाईल. नंतर ओला, बायोडिग्रेडेबल कचरा असेल त्याचे कंपोस्टींग करण्यात येईल. नंतर जो राहील, त्याचा पुनर्वापर (Recycle) केल्यावर उरलेला इन्सिनरेशनसाठी जाईल.

४) **श्री नेव्हल, राहणार - अंधेरी, मुंबईः-**

**प्रश्नः-** सदरहू प्रकल्पात कंपोस्ट निर्मितीसाठी कुठली पध्दत/प्रक्रिया प्रस्तावित आहे?

**उत्तर :-** प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार श्री चक्रधर यांनी सांगितले की मुळात येते विन्ड्रोस पध्दत अंगिकारण्यात येईल. प्लॅटफॉर्मवर विन्ड्रोस प्लॅटर असेल. सदरहू प्रक्रिया ही कन्व्हेनशन असून ती आम्ही नागरी घनकचरा आणि रुपांतरासाठी वापरतो. तर घनकचरा हा जमिन भरावासाठी वापरला जाईल, तर उरलेला वीटा निर्माण करण्यासाठी वापरला जाईल. तसेच सेंद्रीय कचरा हा एनपीकेत रुपांतरित करण्यात येईल, मुख्यतः कंपोस्टींगसाठी वापरण्यात येईल.

५) **श्री मीत चावडा, राहणार - चेंबुर, मुंबईः-**

**प्रश्नः-** प्रकल्प स्थानावर प्रस्तावित असलेल्या वेगवेगळ्या प्रक्रिया युनिट्सबाबत सर्व माहिती मिळू शकेल काय?

**उत्तर :-** प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की ही सर्व माहिती सादरीकरण करताना दर्शविलेली आहे. त्यांनी सांगितले की वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या विविध युनिटची क्षमता दर्शविलेली आहे. त्याचप्रमाणे प्रक्रियेचा ब्रेक-अपही दर्शविलेला आहे.

६) **श्री निकुंज पवार, राहणार - चेंबूर, मुंबईः-**

**प्रश्नः-** या प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी टर्म्स ऑफ रेफरेन्सेस (टीओआर) साठी परवानगी कधी मिळाली? सदरहू टीओआर हा सामान्य जनतेसाठी उपलब्ध आहे का?

**उत्तर :-** प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी उत्तर दिले की पहिल्या स्लाईडमध्येच याबाबत सर्व माहिती देण्यात आलेली आहे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती (SEAC-एससीएससी) यांनी टीओआर हा संमत केलेला आहे. जून २०२० मध्ये टीओआर संमत झाला

व बेसलाईन अभ्यास, सर्वेक्षण नोव्हेंबर, २०२० मध्ये पूर्ण झालेले आहे. ह्याबाबत सर्व माहिती सांगण्यात आलेली आहे. सदरहू टीओआर हा सर्व जनतेसाठी साईटवर उपलब्ध आहे. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी श्री निकुंज पवार यांना त्यांच्या मेलवर टीओआर पाठविण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी बैठकीच्या शेवटी मेलबाबतचे पत्ते उपलब्ध करण्यात येतील असे सांगण्यात आले.

७) **श्रीमती श्वेता भट, राहणार- बोरिवली, मुंबईः-**

**प्रश्न:-** सदरहू प्रकल्पामुळे उत्पन्न होणा-या वायू प्रदूषणाचा आघात परिसरात कसा होईल व त्याबाबत काय उपाययोजना करण्यात येतील? त्याचप्रमाणे जमिन/भूखंड पुनर्स्थापित करण्यासाठी काय उपाय अंगिकारण्यात येतील, कारण सदरहू भूखंडावर खारफुटीची झाडे/मँग्रोस व मडफ्लॅट्स होते, ते कचरा डपिंगसाठी तोडण्यात आले. तरी जमिन/भूखंड पुनर्स्थापित करण्यासाठीची योजना, त्याचप्रमाणे आपण तीची कशाप्रकारे हाताळणी करणार आहात?

**उत्तर :-** प्रकल्प अधिकारी श्री. पिंपळे यांनी सांगितले की, मुळात प्रस्तावित प्रकल्प हा वेस्ट टू एनर्जी (कच-यापासून वीज) निर्मितीचा आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पच हा प्रदूषण नियंत्रणासाठी एक पर्यावरण व्यवस्थापन योजनाच आहे. प्रकल्पातील हवा प्रदूषण नियंत्रणासाठी विविध सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे, विशेषतः फ्ल्यु गॅस स्वच्छतेसाठी २५-३० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

प्रकल्प अधिकारी यांनी पुढे सांगितले की चर्चेत खारफुटी झाडांचा (मँग्रोस) उल्लेख करण्यात आला. त्यांनी सांगितले की देवनार डपिंग हे १९२७ साली सुरु झालेले आहे.

प्रस्तावित प्रकल्प हा अस्तित्वात असलेल्या डंपिंग ग्राऊंड क्षेत्रातच कार्यान्वित करण्यात येईल. त्यामुळे मॅग्रोस व मडफ्लॅट तोडण्याचा प्रश्नच येत नाही. यावेळी मिस भट यांनी आक्षेप नोंदविला की गुगल अर्थवर प्रकल्प स्थानावर मँग्रोस दाखविलेली आहेत.

८) **श्री सुशांत बाली, राहणार-कांदिवली, मुंबईः-**

**प्रश्न:-**घन कचरा व्यवस्थापन कायदा, २०१६ नुसार घनकचरा कमी करणे व घनकचरा वर्गीकरण हे स्त्रोताजवळ (at source) करणे, त्याचप्रमाणे घनकचरा प्रक्रिया ही त्या त्या स्थानाजवळच करणे बंधनकारक आहे. तरी आपण कचरा वर्गीकरण प्रत्येक स्त्रोताजवळ करणे व कचरा प्रक्रियेचे विकेंद्रीकरण त्वरित करणे गरजेचे आहे.

**उत्तर :-** प्रकल्प अधिकारी श्री पिंपळे यांनी सांगितले की आपण योग्य प्रकारे सूचना मांडलेली आहे आणि घनकचरा व्यवस्थापन, २०१६ नुसार कच-याचे स्त्रोताजवळच वर्गीकरण करणे बंधनकारक आहे. त्यासाठी बृहन मुंबई महानगर पालिका प्रचंड प्रयत्न करत असते. प्रकल्प प्रवर्तकांनी वेळोवेळी जनतेस त्याबाबत प्रोत्साहन देत असते. त्याचप्रमाणे वर्गीकरण (ओला व सुका कचरा वेगळा) केलेल्या कच-यासाठी महानगरपालिकेने वेगळ्या गाड्या पुरविलेल्या आहेत. प्रकल्प प्रवर्तकांनी ४६कचरा वर्गीकरण केंद्र मुंबईत

चालू केलेली असून त्याच्या संख्येत भर पडत असते. महानगरपालिका कचरा वर्गीकरण व कचरा प्रक्रिया केंद्रासाठी वेळोवेळी प्रोत्साहन देत असते. महानगरपालिकेने बल्क जनरेटर्ससाठी ते बंधनकारक केलेले आहे. आम्ही सर्वेक्षण करुन बल्क जनरेटर्स निश्चित केलेले आहेत. ते सुमारे ३,००० आहेत. त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाईसुध्दा अवलंबिली आहे.

महानगर पालिका ही स्त्रोताजवळ कच-याचे वर्गीकरण व विकेंद्रीत कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी प्रोत्साहन देते. प्रकल्प प्रवर्तक सर्वार्थाने प्रयत्न करते. तरी १००% घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी हा प्रकल्पसुध्दा एक प्रयत्न आहे.

प्रकल्प अधिकारी यांनी पुढे सांगितले की ८०-८५% घन कचरा हा कांजूर प्रक्रिया प्रकल्पात जातो. उरलेल्या कच-याची येते शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावण्यात येईल. सदरहू प्रस्तावित प्रकल्प हा कचरा निर्मूलन आणि घन कचरा व्यवस्थापन नियम, २०१६चे निर्देश पाळण्यासाठीच आहे. .

९) **श्री प्रमोद नायर, मुंबई : -**

**प्रश्न**:- सॅनिटरी लॅण्ड फिल्डचा संपूर्ण आराखडा उपलब्ध होऊ शकेल काय?

**उत्तर** :- प्रकल्प अधिकारी श्री. पिंपळे यांनी सांगितले की जनसुनावणी समाप्तीनंतर आपणास ईमेल आयडी उपलब्ध करण्यात येईल. आपण आपला ईमेल आयडी पाठविल्यानंतर आपणास सर्व आराखडे पाठविण्यात येतील.

यावेळी श्री मिराज अन्सारी यांनी मत मांडले की जनसुनावणीतील चर्चा ही हिंदीमध्ये करण्यात यावी, त्यामुळे ती सर्वांना कळेल.

१०) **श्रीमती वनिशा सय्यद, राहणार- सांताक्रुझ, मुंबई:-**

**प्रश्न**:- प्रकल्पात प्रक्रियेसाठी लागणा-या पाण्यास आणि प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यास कोणती प्रक्रिया देण्यात येईल?

**उत्तर** :- प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की प्रक्रिया केलेले सांडपाणीच घाटकोपर केंद्रातून येईल. सेडिमेन्टेशन नंतर फिल्ट्रेशन प्रक्रिया देण्यात येईल. रिव्हर्स ऑस्मोसिस सयंत्रणा बसविण्यात येईल व सदरील प्रक्रीया केलेले सांडपाणी या प्रकल्पासाठी वापरण्यात येईल.

११) **श्री प्रदीप मांजरेकर, राहणार-गोवंडी, मुंबई:-**

**प्रश्न**:- तुमचा हा प्रकल्प पर्यावरणीयदृष्ट्या योग्य वाटतो. पण व्यावसायीक व्यवहार्यता (Commercial Viability ) व तांत्रिक व्यवहार्यता (Technical Feasibility) याबाबत सादरीकरणात काहीही माहिती सांगितलेली नाही. त्या मला कशा मिळू शकतील?

**उत्तर** :- प्रकल्प तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की श्री प्रदीप यांनी प्रकल्पाविषयी जे कौतुक केले, त्याबद्दल त्यांची प्रशंसा करतो. सदरहू प्रकल्प हा पर्यावरणीय व्यवहार्यता प्रकल्प आहे. प्रदूषणाकडून विनाप्रदूषणाकडे जाणारा हा प्रकल्प आहे. कारण येथे जो कच्चा माल वापरला जाईल, तो ६००.० टन नागरी घन कचरा आहे. त्यामुळे नागरिकांचा फायदाच आहे. प्रकल्पाचे आर्थिक, व्यावसायिक विश्लेषण अत्यंत काटेकोरपणे अभ्यासण्यात आलेले आहे. सदरहू प्रकल्प हा १००% फायदेशीर आहे. तसेच आपण मागीतलेली माहिती ही सादरीकरण करताना देण्यात आलेली आहे.

१२) **श्री बिलाल खान, राहणार-जुहू, मुंबईः-**

**प्रश्नः-** हा प्रकल्प एम एस प्रभागात सुरु करण्यात येणार आहे. प्रकल्पात जर आग लागली तर त्याचा धुर कुलाब्यापर्यंत जाईल. एम पूर्व प्रभागाची लोकसंख्य ही नऊ लाख आहे. मात्र १% लोकही हया जनसुनावणीत भाग घेऊ शकले नाही.

**उत्तर** :- सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की हा प्रकल्पासाठी जनसुनावणी तारखेच्या अगोदर ४५ दिवस ईआयए अधिसूचनेनुसार एक स्थानिक वृत्तपत्र नवशक्ती यात स्थानिक भाषेत (महाराष्ट्र राज्याची स्थानिक भाषा मराठी आहे) व एक राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री प्रेसमध्ये इंग्रजीमध्ये जनतेसाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदरहू प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश मराठी व इंग्रजीत एमपीसीबीच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल हा इंग्रजीत व मराठीत शासनाच्या अधिसूचित कार्यालयात जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगरे, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, उप प्रादेशिक कार्यालय-मुंबई-३, प्रादेशिक कार्यालया-मुंबई, सहायक आयुक्त, मुंबई महानगर पालिका, एम/पूर्व वार्ड, देवनार म्युनिसिपल ऑफिस, गोवंडी येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेला होता. कोविड-१९ च्या साथीच्या लॉक डाऊनमुळे स्थानिक लोकांना त्रास होऊ नये व सर्वांना जनसुनावणीत भाग घेता यावा, म्हणून सदरहू जनसुनावणी ही ऑनलाईन घेण्याची परवानगी दिल्यानंतर याचीही आगाऊ जाहिर सूचना वरिल वृत्तपत्रात दिनांक २१.०४.२०२१ रोजी प्रकाशित करण्यात आलेली होती.

उपस्थितांनी वृत्तपत्रातील जाहिर सूचनेबाबत आक्षेप नोंदविला असताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसारच जाहिर सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत ४५ दिवस अगोदर प्रकाशित करण्यात आलेली आहे.

**१३) श्री मोहन कदम, राहणार-मालाड, मुंबई:-**

**प्रश्न:-** मी २७ वर्षे या घन कचरा व्यवस्थापन क्षेत्रात काम करत आहे. माझा अनुभव आहे की मुंबई महानगरपालिका पर्यावरणाच्या क्षेत्रात कामामध्ये अतिशय मागे आहे. मात्र आता त्याबाबत पुढाकार घेत आहे. त्यावेळी उपस्थितांपैकी एकजण श्री मोहन कदम यांना म्हणाले की आपण चुकीची माहिती देत आहात. त्यावेळी उपस्थितांमध्ये वादविवाद होऊ लागले.

**उत्तर :-** सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना ही वादविवाद करण्यासाठी बैठक नसून जनसुनावणी आहे अशी सूचना दिली. प्रश्न विचारायचा असल्यास तो एका पाठोपाठ विचारावा अशी सूचना केली.

**१४) श्री आनंद पेंढारकर, राहणार , मुंबई:-**

**प्रश्न:-** पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा वेबसाईटवर ठेवलेला असावा. त्याचप्रमाणे तो पाच भारतीय भाषेत उदा. इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराथी इ. भाषेत प्रकाशित करण्यात यावा. तसेच ते पुढे म्हणाले की युरोपात जवळजवळ ४३४ असे प्रकल्प बंद करण्यात आलेले आहेत. आता ते तंत्रज्ञान जुने झालेले आहे. युरोपातील २०२०-२०३० पर्यंत सर्व इन्सिनरेशन प्रकल्प हे बंद करण्यात येणार आहेत. आपण जुने तंत्रज्ञान घेऊन लोकांना सांगत आहोत की हा प्रकल्प खूप चांगला आहे. परंतु अशा प्रकल्पांना मुंबई महानगर क्षेत्रात कार्यरत राहण्याची परवानगी आहे काय? कारण पार्ले बिस्कीट कंपनीसही मुंबई महानगर क्षेत्राच्या बाहेर कार्यरत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, तरी आपण हा प्रकल्प राबविण्याचा विचार का करत आहोत? जसे सर्वांना सांगितले की कच-याचे प्रमाण, प्लँस्टीक वापर कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. असा प्रकल्प शहरात असणे हे सर्वात जास्त घातक आहे. जनतेस चुकीची माहिती सांगण्यात आलेली आहे. तर या प्रकल्पास मी पाठिंबा देत नाही.

**उत्तर:-** प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की हा जो प्रकल्प आहे, तो राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती समोर सादर करण्यात आलेला आहे. भारत सरकारने हवा प्रदूषणास घालून दिलेले मानकांचे पूर्णपणे पालन करण्यात येणार आहे. तसेच सदरील प्रकल्प हा प्रशासनाच्या नियमानुसार परवानगी अंतीच सुरु करण्यात येईल.

**१५) श्री पराग देसाई, राहणार- चेंबूर, मुंबई:-**

**प्रश्न:-** मी हिंदुस्थान टाईम्सचा वार्ताहर आहे. मी तांदुळवाडी, चेंबूरचा रहिवाशी आहे. त्यांनी सांगितले की त्याही सूचना/आक्षेप नोंदवित आहेत

अ)जनसुनावणीच्या अगोदर ईआयए. २००६च्या अधिसूचनेनुसार, ईआयए अहवाल हा पब्लिक डोमेनवर उपलब्ध असणे आवश्यक आहे. तरी पब्लिक डोमेनवर ईआयए उपलब्ध नसल्याचे स्पष्टिकरण द्यावे.

ब) प्रकल्पाची सद्यस्थितीबाबत माहिती देण्यात यावी. सदरहू प्रकल्प हा Eco-Sensitive Zone ठाणे क्रीक फेल्मींगो पक्षांच्या अभयारण्यात, वन्यजीव अभयारण्यात येतो का?

क) प्रकल्पात आपत्कालीन व्यवस्थापन योजनेबाबत तयार असल्यास त्याच्या माहितीची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

**उत्तर:-** प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की ठाणे फ्लेमिंगो अभयारण्याचा प्रश्न आहे, तर प्रकल्प हा अभयारण्यचा बाहेर आहे. प्रकल्प हा २०१६ च्या अधिसूचनेनासरच कार्यान्वित करण्यात येईल. म्हणून आम्ही आमची सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा मजबूत करत आहोत. कारण दिल्लीच्या प्रकल्पात याबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेला होता, त्यापासून आम्ही धडा शिकलो आहोत.

या प्रकल्पास फक्त राज्य शासनाच्या मान्यतेची गरज आहे. त्यांनी स्पष्टीकरण दिले की २००६च्या अधिसूचनेनुसार १५ मेगावॅटपेक्षा कमी असल्यास त्यास पर्यावरण अनुमतीची आवश्यकता नाही. पण येथे लॅण्ड फील साईट हा प्रकल्पाचा एक भाग असल्याने पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक आहे. प्रकल्प प्रवर्तकांचा ४-८ मेगावॅट वीजनिर्मितीचा प्रस्ताव लॅण्ड फील साईटबरोबरच आहे. आपात कालीन व्यवस्थेबाबत सविस्तर माहिती पर्यावरण मुल्यांकन आघात (EIA) अहवाल मध्ये दिल्या प्रमाणे करण्यात येईल.

**१६) श्री राजकुमार शर्मा, चेंबूर, मुंबई:-**

**प्रश्न:-** मला बॉटम एश कशी हाताळणी करणार याबाबत माहिती देण्यात यावी, सदरहू प्रकल्प हा व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य आहे का? जर नसेल, तर खाजगी कंपनी यात कशी गुंतवणूक करेल?

त्यांनी पुढे सांगितले की कांजूरमार्ग डंपिंग ग्राऊंड हे ७,००० सद्यस्थितीत मुंबई शहर हे ६,३०० ते ६,५०० टन कचरा निर्मिती करते. म्हणजे कांजुर डंपिंग ग्राऊंड मुंबईचा सर्व कचरा हाताळू शकते. त्यामुळे दुस-या प्रकल्पाची गरजच नाही.

त्यांनी शेवटचा प्रश्न विचारला की ६०० टन कच-यातील किती टन कचरा वीजनिर्मितीसाठी वापरण्यात येईल.

**उत्तर :-** प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की प्रकल्पाची व्यवहार्ता अभ्यासण्यात आलेली आहे. सुरवातीस सांगण्यात आलेले आहे की अशा प्रकारचे काही प्रकल्प देशात यशस्वीपणे कार्यरत आहेत. खर्चाचा विचार केल्यास ते प्रकल्प प्रदूषण करण्यापेक्षा पर्यावरण व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण करत आहेत. वेस्ट टू एनर्जी हीच कल्पना राबविण्यासाठी सदरहू प्रकल्पाची आवश्यकता आहे. फ्लुगॅस स्वच्छतेसाठी अत्यंत आधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. आपण सर्वांना सदरहू प्रकल्प उत्पादन प्रकल्प न पाहता प्रदूषण नियंत्रण प्रकल्प पाहावा. हाच फरक इतर उत्पादन प्रकल्प व वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात आहेत.

प्रकल्प तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की ६०० टन कच-यापासून ४१० टन आरडीएफ निर्मिती करण्यात येईल, ते आरडीएफ इंधन म्हणून वापरण्यात येईल.

कांजूरमार्ग डंपिंग ग्राऊंड त्याची जी क्षमता आहे ती पुढील २५ वर्षांसाठी आहे. पुढील चार वर्षांपर्यंत तो ५.५० टनच राहिल. आम्हांला याबाबत पूर्ण जाणीव आहे. आम्ही कार्यरत प्रकल्पाचा अभ्यास करुनच हे आकडे गृहित धरलेले आहेत असे सांगीतले. तसेच जो एकत्रित कचरा प्रत्येक प्रभागातून येतो, त्यात ओला व सुका कचरा असतो. त्याचे प्रमाण (परसेन्टेज) पूर्णपणे बदलणार आहे. जसा कचरा येईल, त्याप्रमाणे हाताळणी करण्यात येईल व त्याचा पुनर्वापर केला जाईल असे सांगीतले.

१७) **श्री मंदार कुलकर्णी, अंधेरी, मुंबई:-**

**प्रश्न** :- हा प्रकल्प योग्य वाटतो. मात्र एक शंका आहे की साईटवर काम करताना इथे सर्वांना दिसते की लोक कचरा टाकून देतात. तरी जनतेने कचरा न टाकणे याबाबत कार्यवाही व्हावी. घरी बसून आक्षेप नोंदविणे हे सोपे आहे.

**उत्तर** :-आपण सर्वांनी काळजी घ्यायची आहे. महानगरपालिक काळजी घेईल.

१८) **मिस प्रिया त्रिवेदी, मानखुर्द (पूर्व), नवी मुंबई:-**

**प्रश्न**:- मिस प्रिया त्रिवेदी यांनी सांगितले की चॅट बॉक्समध्ये अनेक लोकांनी प्रश्न विचारले आहेत, त्यांचे उत्तर देण्यात यावे. लिचेट प्रमाण (Quantity) व त्यावर प्रक्रिया काय राहिल?

**उत्तर** :- यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी प्रथम जनसुनावणीतील प्रश्नांना उत्तर देण्यात येईल, नंतर ऑनलाईन चॅटला उत्तरे देण्यात येतील असे सांगितले. प्रकल्प तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले एमईई व थर्मल तंत्रज्ञान कार्यान्वित केल्यानंतर प्रकियेनंतर ६० केएलडी लिचेट उत्पन्न होईल. त्याबाबत सविस्तर अहवाल तयार आहे.

वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पामध्ये अत्यंत आधुनिक यंत्रणेचा वापर करण्यात येईल. तसेच ६०० टन कच-यापासून ४१० टन आरडीएफ निर्मिती करण्यात येईल, ते आरडीएफ इंधन म्हणून वापरण्यात येईल.

१९) **श्री अनिल हब्बा, राहणार-मुलुंड, -**

**प्रश्न**:- मी देवनार डंपिंगच्या बाजूस वीस वर्षे राहत होतो आता मी मुलुंड डंपिंगच्या बाजूस दहा वर्षे राहत आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की सर्व मुंबईचा कचरा हा एका मतदारसंघातच कसा येतो? या मुद्द्यावर मी लोकसभा निवडणूक लढवली आहे. माझे असे म्हणणे आहे की जर प्रकल्पात नविन कचरा ६०० टन वापरणार, तर १९२७ पासून देवनार डपिंग ग्राऊंडमधील कचरा वापरणार आहात काय? का पहिला विसरुन जाणार.

**उत्तर**:- प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की नागरी घन कचरा नियम, २०१६ नुसार मुलुंड डपिंग ग्राऊंडचे बायो मायनिंग काम चालू आहे. देवनारमध्ये त्याचे प्रमाण खूप आहे. नागरी घन कचरा नियम, २०१६नुसार बायो मायनिंग करणे बंधनकारक आहे. म्हणून प्रकल्प प्रवर्तकानी नीरी या संस्थेस नियुक्त केले. मुंबई उच्च न्यायालयाने मॉनिटरींग कमिटी नियुक्त केलेली आहे बायो मायनिंग करताना कच-याचा जो डोंगर उभा आहे, त्याचे काय करायचे, तो बायो मायनिंग करताना अर्धवट बंद करायचा का याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**२०)श्री व्यंकटेश, गोवंडी, मुंबईः-**

**प्रश्न**:- प्रस्तावित प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर कोणती प्रक्रिया करण्यात येईल?

**उत्तर**:- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. एसईएसी (SEAC – State Environment Appraisal Committee) ने सुध्दा सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) असण्याची सूचना केलेली आहे. प्रकल्प प्रक्रियेत उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर प्रकल्पात हरित पट्टा विकसित करण्यासाठी करण्यात येणार आहे. प्रकल्पात 33%.हरित पट्टा विकसित करण्यात येईल.

**२१)श्री पवित्रा श्रीवास्तव, म्हाडा कॉलनी, चेंबूर, मुंबईः-**

**प्रश्न**:-जर आपण नागरी घन कचरा व्यवस्थापन, २०१६ बाबत चर्चा करतो, तर त्यातील निर्दशांनुसार घन कचरा कमी करण्याबाबत काहीही बोलत नाही.

आता असे सांगण्यात आले की ईआयए अहवाल हा मेलने पाठविण्यात येईल. मात्र तो पाठविण्यापेक्षा वेबवर असणे योग्य होईल.

त्यांनी पुढे विचारणा केली की स्थानिक बैगनवाडीतील लोकांना विश्वासात घेतले आहे काय,

२८ दिवसात विंड्रोझ पूर्ण होणार नाही.

**उत्तर**:- प्रकल्प तांत्रिक सल्लागार यांनी उत्तर दिले की कंपोस्टींबाबत सांगायचे म्हणजे ज्याठिकाणी नागरी घन कचरा प्रकिया केंद्रे आहेत, तेथे कंपोस्टींग प्रकल्प असतो. कंपोस्टींगसाठी तीन मापदंड (Parameters) महत्वाचे आहेत PKN parameters, Carbon to Nitrogen generation, Temperature and Inoculum).

या तीन्ही मापदंडाचे ऑपटीमायझेशन केल्यानंतर ६० दिवस लागणार नाहीत. फक्त ऑक्सीजन सॅचुरेशन पातळी, सीएन रेशिओ, तापमान देखभाल. यावेळी श्री पवित्रा यांनी ओलावा (Moisture) सुध्दा विचारात घ्यावा असे सांगितले.

प्रकल्प अधिकारी श्री पिंपळे यांनी सांगितले की ओला कचरा व सुका कचरा हा स्त्रोताशी वर्गीकरण करण्यासाठी बृहन मुंबई महानगरपालिका ही वेळोवेळी जागृत्ती निर्माण करण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम हाती घेते.

त्यावेळी ऑनलाईन उपस्थितांनी आपापसात चर्चा करण्यास सुरवात केली. यावेळी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपसात चर्चा करु नये. जे जे प्रश्न विचारण्यात आले, त्याची उत्तरे देण्यात आलेली आहेत. प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती, प्रकल्पाची क्षमता, प्रकल्पास लागणारा कच्चा माल याबाबत संपूर्ण माहिती सांगण्यात आलेली आहे. त्यास प्रकल्प प्रवर्तक, प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी योग्यप्रकारे उत्तरे दिलेली आहेत. प्रारुप ईआयए अहवाला उपलब्ध करण्यात आलेला आहे. कार्यकारी सारांश अहवाल हा इंग्रजी व मराठीत सूचित केलेल्या शासकीय कार्यालयात व बृहन मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की श्री प्रसाद काळे, वरिष्ठ संरक्षक अधिकारी, कंझर्वेशन ॲक्शन ट्रस्ट, घाटकोपर, मुंबई यांनी ३१ मार्च, २०२० रोजी १०५ प्रश्न प्रदूषण नियंत्रण कार्यालय व इतर विभागांना पाठविलेले आहेत. सदरहू प्रश्न म.प्र.नि.मंडळाने प्रकल्प प्रवर्तक बृहन मुंबई महानगर पालिकेस पाठविले आहेत. याबाबत त्यांनी श्री पिंपळे यांनी संक्षिप्त माहिती देण्याची सूचना केली.

२२) **<u>श्रोत्रीया, अध्यक्ष, डब्लुटीआरटी कांसील, ठाणे-</u>**

**प्रश्न:-** प्रस्तावित प्रकल्पात ५० मी. धुरांड्याची मॉनिटरिंग करण्यात येणार आहे. तरी सदरहू प्रस्तावित प्रकल्पासाठी एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांची परवानगी घेतली आहे काय? जर घेतली नसेल, तर आरडीएम व कंपोस्ट यांचे प्रमाण घेतलेले असेल, तर मास बॅलन्सला जाणे व नंतर टेस्टींगला जाणे योग्य आहे. त्यासाठी मी एक स्वतंत्र अभियंता नियुक्त करण्याची शिफारस करतो, तो सर्व प्रकल्प स्थापनेपासून सर्व बाबींचे अनुपालन करेल.

**उत्तर:-** यावेळी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवाल म.प्र.नि.मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. श्री पिंपळे, प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रारुप ईआयए हा बृहन मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे श्री पिंपळे, प्रकल्प अधिकारी यांनी म.प्र.नि.मंडळास कॉन्झरव्हेशन ट्रस्ट तर्फे प्राप्त झालेल्या १०५ सूचना, आक्षेपांबाबत निवेदन दिले. त्यांनी सांगितले की प्रश्न, आक्षेपकांना सादरीकरणात उत्तर देण्यात आलेली आहेत. फक्त सीआरझेड मुद्द्याचे उत्तर सादरीकरणात नाही. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होती की प्रकल्पातील सांडपाणी हे जवळील खाडीत जाईल, त्यामुळे तेथील पाण्यावर

व पक्षांवर त्याचा परिणाम होईल. प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की याबाबत पूर्वीच उत्तर देण्यात आलेले असून परत सांगण्या येते की सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

**२३)कु. राधिका झवेरी, वाशी, नवी मुंबई:-**

**प्रश्न:-** त्यांनी हिन्दीमध्ये मत मांडले की येथील पर्यावरण समितीचा रवैय्या/विचार झालेला आहे. त्यांना प्रकल्प सुरु करायचा आहे. लोक काहीही आक्षेप, सूचना करोत. घन कचरा व्यवस्थापन मुंबई, ठाणे, पनवेल कुठेही चांगले नाही. बरीच कमतरता आहे. आपण हा प्रकल्प सुरु करण्याचा आपले मत पक्के केलेले आहे.

**उत्तर:-** श्री पिंपळे, प्रकल्प अधिकारी यांनी त्यांना विशिष्ट प्रश्न विचारण्याची सूचना केली. त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या पर्यावरण व तांत्रिक प्रश्नांना उत्तरे देण्यात आलेली आहेत.

**२४) श्री रोहित जोशी, ठाणे:**

**प्रश्न:-** सदरहू प्रकल्प हा व्यावसायिक व्यवहार्य आहे याबाबत सादरीकरणात काहीह सांगितलेले नाही. त्याचप्रमाणे सादरीकरणात सांगितले की या प्रकल्पामुले ४०० लोकांना नोकरीच्या संधि उपलब्ध होतील. मात्र मी नुकतेच एक बातमी वाचली त्यात माहिती दिलेली आहे की भारतात जेथे जेथे वेस्ट टू एनर्जी प्रकल्प आहेत, ते कार्यरत नाहित, कारण ते तांत्रिक व व्यावसायिकदृट्या व्यवहार्य नव्हते. जर हा प्रकल्प व्यवहार्य असेल, तर त्याबाबत अहवाल कुठे मिळेल? आताच जनसुनावणीत सांगण्यात आलेले आहे की एका ट्रस्टने १०५ प्रश्न विचारले आहेत. जर ते प्रश्न आम्हांला आधी सांगितले असते, तर प्रश्नांची पुनरावृत्ती झाली नसती. कोविडमुळे कमी लोक ऑनलाईनही येऊ शकले नाहित. ब-याच लोकांना सदरहू प्रकल्पामुळे संभाव्य पर्यावरण आघातांविषयी काहीही माहिती नाही. तरी माझा आक्षेप व सूचना आहे की जोपर्यंत प्रारुप ईआयए अहवाल वेबवर लोड होत नाही, तोपर्यंत बैठक स्थगित करण्यात यावी. प्रारुप ईआयए अहवाल वेबवर लोड केल्यानंतर व कोविड साथीचा रोग नाहिसा झाल्यानंतरच जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

**उत्तर:-** श्री पिंपळे, प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पाची तांत्रिक व व्यावसायिक व्यवहार्ता याबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रारुप ईआयए हा जनसुनावणी दिवसाच्या ४५ दिवस अगोदर सूचित शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यांनी सांगितले की नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू. सेक्रेटरिएट

बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४०००१, मा .जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगरे, मा .अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगरे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, मुंबई उपनगरे, सहायक आयुक्त, एम/पूर्व वॉर्ड, मुंबई महानगर पालिका, ऑफिस बिल्डिंग, स्वर्गीय मधुकर तुकाराम कदम मार्ग पेरीफेरी रोड जंक्शन, देवनार म्युनिसिपल कॉलनी, गोवंडी(पूर्व), मुंबई – ४०००४३, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, सहसंचालक (जल प्रदूषण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप प्रादेशिक अधिकारी-मुंबई-३, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, आणि मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

त्याचप्रमाणे जाहिर सूचना 45 दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्र जनशक्ती यात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री प्रेसमध्ये इंग्रजीत प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे कोविड-१९ साथीच्या रोगामुळे आपत्कालिन परिस्थिती उत्पन्न झाल्याने देण्यात आलेल्या आदेशांनुसार सदरहू जनसुनावणी ही ऑनलाईन घेण्याची सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी केलेल्या सूचनांनुसार प्रारुप ईआयए अहवाल हा बृहन मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवर उपलब्ध करण्यात येईल. त्यावर सूचना, आक्षेप पुढील चार दिवसात सादर करण्यात याव्यात. त्या सूचना जनसुनावणी बैठकीच्या इतिवृतान्तासोबत व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येतील. त्याबाबत शासन योग्य तो निर्णय घेईल.

सदरहू प्रश्नांना दिलेली उत्तरे प्रश्नकर्त्याला दिली जातील व शासनास सादर करण्यात येतील. त्याचप्रमाणे सर्व प्रश्न हे इतिवृतान्तासोबत जोडण्यात येतील.

येथे श्री मिराज अन्सारी यांनी सूचना केली की प्रारुप ईआयए बृहन मुंबई महानगरपालिका पोर्टलवर उपलब्ध झाल्यानंतर एक महिन्याची मुदत देण्यात यावी. ~~त्यांनी सांगितले की ते आम आदमी पक्षाचे स्थानिक प्रतिनिधी आहेत~~. देवनार डंपिंग ग्राऊंड शेजारी राहणा-या अनेक लोकांनी वेळोवेळी महानगरपालिक, जिल्हाधिकारी कार्यालय, म.प्र.नि.मंडळास तक्रारी केलेल्या आहेत. तेथील स्थानिक लोक हे कच-याच्या डंपिंग ग्राऊंडमुळे टी.बी., कॅन्सर सारख्या आजाराने त्रस्त आहेत. त्यामुळे विरोध होतो. स्थानिक लोक खुल्या डंपिगमुळे व आकस्मिक लागणा-या आगीमुळे त्रस्त आहेत. जर आपण त्यांना विश्वासात घेतले नाही तर त्यांचा विरोध राहिल. तरी स्थानिक जनतेची एक बैठक आयोजित करण्यात यावी व त्यांना विश्वासात घेण्यात यावे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सुचना, टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. बैठकीत सांगितल्याप्रमाणे बृहनमुंबई महानगर पालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे ईमेल पत्ते उपलब्ध करण्यात आलेले आहेत. लेखी सूचना, आक्षेप या चार दिवसात सादर करण्यात याव्यात. बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन त्याबरोबर लेखी आक्षेप, अंतिम पर्यावरण अहवालासोबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबेई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी प्रकल्प अधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व ऑनलाईन उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

माननीय अध्यक्ष, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगरे, मुंबई तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेल्या आदेश नुसार पर्यावरण आघात मूल्यांकन अहवालाची प्रत बृहन मुंबई महा नगर पालिकेच्या पोर्टल वर दहा दिवस ठेवण्यात आली होती व ई-मेल द्वारे आलेल्या सूचना, टीका टिप्पणी , आक्षेप हे एकत्रित करून त्यावर प्रकल्प धारकाचे म्हणणे हे परिशिष्ट -१ मध्ये या इतिवृता सोबत जोडले आहे

सोबत:- सर्व लेखी आक्षेप जोडलेले आहेत.

**(प्रमोद माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,मुंबई-3,
म.प्र.नि. मंडळ, मुंबई

**(डॉ. अनंत हर्षवर्धन)**
सदस्य,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**( डॉ.विकास नाईक)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, मुंबई उपनगरे,